महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
Maharashtra Electricity Regulatory Commission

क्र. मविनिआ/प्रशा/म.वि.स./२०१५/००८८२ दि. ०२.११.२०१५

प्रति,
श्री. प्र. स. मयेकर
अवर सचिव (समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन
मुंबई ४०००३२

विषय :- सार्वजनिक उपक्रम समितीच्या पहिल्या (२०१५-१६) अहवालावरील शासनाने /महामंडळाने केलेल्या कार्यवाहीसंबंधी माहिती पाठविणेबाबत.

संदर्भ :- आपल्या कार्यालयाचे पत्र क्र. २९९१३/ म.वि.स./साऊस/ ५२६,दि. २९ जुलै, २०१५

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये महाराष्ट्र शासनाच्या सन २००९-२०१० च्या लेखांवरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग" यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्र. तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.२१ यावरील सार्वजनिक उपक्रम समितीच्या पहिल्या अहवालातील शिफारशींवर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागविण्यात आली होती.

सार्वजनिक उपक्रम समितीने केलेल्या शिफारशी विचारांत घेऊन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (सल्लांगारांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती) विनियम २००४, मधील विनियम ३ (१) (२) नुसार एकाच स्त्रोतातून निवड करण्यासंबधी जी तरतूद आहे त्या तरतुदींमध्ये आयोगाकडून खालीलप्रमाणे सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे.

विनियम ३ (१) (२) मधील तरतूद

३. नियुक्ती:- (१) आयोग कोणत्याही कामासाठी त्या कामाचे स्वरुप आणि त्यातील क्लिष्टता लक्षात घेऊन त्यास योग्य वाटेल अशी कार्यपध्दती अवलंबून, ज्यात खालील बाबींचाही समावेश असेल पूर्णत: त्याच्या इच्छेनुसार सल्लागाराची नेमणूक करु शकेल:-

(१) परिशिष्ट अ प्रमाणे बोलीदारांनी सादर केलेल्या स्पर्धात्मक प्रस्तावांचे मुल्यांकन;

(२) एकाच स्त्रोतातून निवड;

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

वरील तरतूदीमध्ये खालील परंतुकाचा समावेश करण्याचे प्रस्तावित आहे.

*"परंतु असे की, एकाच स्त्रोतातून निवड ही अपवादात्मक परिस्थितीत व आयोगाच्या कामकाजाच्या दृष्टीने उचित आणि आयोगास लाभदायक असेल, जसे की सल्लागाराने भुतकाळातील केलेले काम पुढे चालू ठेवण्याची आवश्यकता असणे किंवा ज्यावेळी कालमर्यादेमुळे तातडीने नियुक्ती करणे गरजेचे असेल किंवा लहान स्वरूपाच्या कामासाठी जेथे रू. पाच लाखांपेक्षा जास्त शुल्क द्यावे लागणार नसेल किंवा वार्षिक तत्त्वावर रू. बारा लाखाच्या मर्यादेत वैयक्तिक किंवा संस्थात्मक सल्लागार रिटेनरशिपवर नेमावयाचा असेल किंवा जेंव्हा एकच व्यक्ती किंवा संस्था संबधित कामासाठी पात्र किंवा अनुभवी असल्याचे आढळून येते असेल तेंव्हा, त्यासंबधीची कारणे लेखी नोंदवून करता येईल."*

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (सल्लागारांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती) विनियम, २००४ मधील तरतूदींमध्ये वरील प्रमाणे सुधारणा करण्याचे काम कार्यवाहीत असून सदर काम पुर्ण झाल्यानंतर त्याबाबत आपणास कळविण्यात येईल.

आपला विश्वासू,

(प्रफुल्ल वऱ्हाडे)
संचालक (विद्युत अभियांत्रिकी)

प्रत -
श्री. सं. श. शिरसीकर
सहसचिव (ऊर्जा -२)
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

४.५ अभिप्राय व शिफारस :-

भारताचे नियत्रंक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ३.२१ 'समंत्रना कामाचे अनियमित प्रदान' या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली, महालेखापरिक्षकांनी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग, हा राज्य शासनाच्या मुख्य कामात वीज दराचे सुसूत्रीकरण, राज्यातील विद्युत निर्मिती, विद्युत पारेषण व विद्युत वितरण या विषयाशी संबंधित प्रकरणावर शासनास सल्ला देणे व परवाने जारी करणे इत्यादी कामासाठी स्थापन केलेला आयोग असल्याने त्यांच्याकडे आलेल्या प्रकरणांवर निर्णय देण्यासाठी व त्याच्या मदतीकरिता प्रत्येक प्रकरणानुसार सल्लागार म्हणून वेगवेगळया संस्थाची नेमणूक करीत असतो या संदर्भात आयोगाने नियमानुसार पारदर्शक बोली प्रक्रियेचा अवलंब न करता कन्सल्टन्सीचे कंत्राट खाजगी संस्थेला जास्त दराने प्रदान केल्यामुळे, कन्सल्टन्सी चार्जेस रुपये ९.६६ कोटी एवढा अनियमित खर्च केला गेला असल्याचा आक्षेप नोंदविला होता. त्यांबाबत साक्ष घेतांना एबीपीएसआयए कंपनी व्यतिरिक्त इतर दोन कंपन्यानी देखील सल्लागार सेवेचे कंत्राट मिळविण्याकरिता प्रस्ताव सादर केले होते. त्यांचे प्रस्ताव फेटाळल्यानंतर या दोन्ही संस्थांमधून प्रत्येकी दोन अधिकाऱ्यांनी नोकरीचा राजीनामा देऊन भागीदारी संस्था स्थापन केली होती. अशा प्रकारे आयोगाने नियम पाळून निविदा प्रक्रिया न राबविता एखाद्या एजन्सीला कंत्राट दिले जात असेल तर ही बाब अत्यंत आक्षेपार्ह असून अशा व्यवहारामध्ये बऱ्याच प्रमाणात गैरप्रकार होण्याची शक्यता असल्याने अयोग्य व चिंताजनक आहे. असे प्राप्त माहितीच्या आधारे समितीचे मत झालेले आहे. याकरिता महामंडळाच्या कामाच्या पद्धतीमध्ये पारदर्शकता असली पाहिजे. एकाच कंपनीला कंत्राट मिळाल्यास त्याबाबत शंका उत्पन्न होऊ शकते. त्यामुळे स्पर्धात्मक बोली लावून निविदा प्रक्रिया पार पाडली पाहिजे. म्हणून सदर विनियमनामध्ये बदल करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे. या संदर्भात संबंधित विभागाच्या प्रमुखाने बारकाईने लक्ष घालावे म्हणजे भविष्यात अशी प्रकरणे घडणार नाहीत. असे समितीचे मत झाले आहे.

तसेच आयोगाची स्थापना झाल्यानंतर पहिल्यांदाच सल्लागार सेवेचे कंत्राट देण्यात आले त्यामुळे हे सर्व हेतुपूर्वक करण्यात आले आहे. असे समितीचे मत नाही. तथापि, जनसामान्यांच्या हिताकरिता केंद्र शासनाने कायदा लागू केलेला आहे. त्या कायद्याचे पालन करून या आयोगाने जनहित जपले पाहिजे. तसेच त्यांना त्या कायद्याचा लाभ मिळाला पाहिजे. कंत्राट नियमानुसार दिले गेले पाहिजे. कंत्राट देण्याच्या कार्यवाहीत आयोगाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष घातले पाहिजे. आणि या सर्व प्रक्रियेवर शासनाचे देखील नियंत्रण असणे आवश्यक आहे. त्यास्तव आयोगास अवगत करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

याप्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

---